जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २११ दिनांक - १२/०४/२०२४**

वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर

# फायरींग मधील मोक्का गुन्हयातील १० महिन्यापासून फरार असलेला आरोपी जेरबंद

वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय पतंगे यांनी तपास पथक प्रभारी व स्टाफ यांना गुन्हयाचे अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे दि.०८/०४/२०२४ रोजी सुचने प्रमाणे तपास पथकातील स्टाफ हा मकोकातील पाहिजे आरोपींचा शोध घेताना **पोलीस हवालदार सर्फराज देशमुख** यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, वानवडी पो.स्टे.गुन्हा रजि.नं. २५८/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७,१२०(ब), २१२,१०८,१०९,२०१, ३४, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम कलम ३(१)(ii),३(२),३(४) या गुन्हयातील पाहिजे आरोपी **अक्षय नागनाथ कांबळे, रा.ससाणेनगर, लेन नंबर १५, हडपसर पुणे** हा रामटेकडी इंडस्ट्रियल एरिया, रेल्वे अंडरबायपास जवळ, रामटेकडी, हडपसर पुणे येथे कोणाची तरी वाट पहात थांबलेला आहे

अशी बातमी मिळाल्याने सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वानवडी पो.स्टे. पुणे यांना कळविली असता त्यांनी बातमीचे ठिकाणी जावून नमूद आरोपीचा शोध घेवून तो मिळून आल्यास योग्य ती कारवाई करणेचे आदेशीत केल्याने तपास पथकातील स्टाफ रवाना झाले. मिळालेल्या माहितीचे आधारे वरील दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे अक्षय नागनाथ कांबळे यास शिताफिने ताब्यात घेवून त्यास अटक करण्यात आली.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त परि.-५, पुणे शहर श्री आर राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री गणेश इंगळे, वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.संजय पतंगे, पोलीस निरिक्षक (गुन्हे) श्री.राजेंद्र करणकोट यांचे मार्गदर्शनाखाली व तपास पथकातील पोलीस उप निरिक्षक संतोष सोनवणे, हरिदास कदम, सर्फराज देशमुख, महेश गाढवे, अमजद पठाण, विनोद भंडलकर, अतुल गायकवाड, यतिन भोसले, गोपाल मदने विष्णु सुतार, अमोल गायकवाड, संदिप साळवे, यांनी केलेली आहे.


वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
फोन नं. : ०२०-२६८२५९८९